# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी शेड्युल बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडण्याबाबतच्या आदेशासंबंधी स्पष्टीकरण.

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि. १५/१०/२०१६ चे आदेश

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाकीत दि. १५/१०/२०१६ च्या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांकरिता निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यासाठी वेळ (Time) व रित (Manner) निश्चित करण्यात आले आहे. सदरहू आदेशामध्ये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने शेड्युल बँकेमध्ये एक स्वतंत्र खाते उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करावे असे नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात शेड्युल बँकेमध्ये उघडावयाचे स्वतंत्र खाते हे बचत खाते (Saving Account) असावे की चालू खाते (Current Account) असावे, याबाबत तसेच बँके खाते राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडता येईल किंवा कसे या मुद्दयावर आयोगाकडे विचारणा करण्यात येत आहे. यासंदर्भात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे :-

i) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने राष्ट्रीयकृत बँकेतील / शेड्युल बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून त्या खात्याचा तपशील निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे.

ii) उमेदवार बँकेमध्ये बचत अथवा चालू खाते उघडून त्याचा तपशील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करु शकेल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

n:\MAHALE\Wagale\उमेदवाराचे बँक खाते.docx/महाले